# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 26/03/2020 (गुरूवार)
(दुपार)

## घरफोडी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा विनोबाभावे वार्ड रामटेक येथे दिनांक 23/03/2020 चे 20.00 ते 24/3/2020 चे 21/00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. ललिता रमेश बन्सोड, वय 35 वर्ष, रा. विनोबा भावे वार्ड रामटेक या घराच्या दाराला कुलुप लावुन बाहेरगावी गेल्या होत्या. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या घराचा मागील टिनाचे पत्रे वाकवुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादींच्या घरातील कपाट उघडुन लॉकर तोडुन त्यातील सोन्याचे दागिने किं. 20,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सदाशिव काटे 9011326793 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर पंचायत समीती कळमेश्वर खरेदी विक्रीच्या गेटसमोर दिनांक 21/03/2020 चे 16.00 ते 20.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विजय बळीराम भांगे, वय 56 वर्ष, रा. कळंबी यांनी त्यांची एमएच– 40/एए– 7838 क्रमांकाची हिरो होन्डा शाईन मोटरसायकल पंचायत समिती खरेदी विक्रीच्या गेटसमोर उभी करून ठेवली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 30,000/–रु. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिनेश गांवडे 9823564567 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर एनएच बायपास बोर्डा येथे दिनांक 25/03/2020 चे 15/00 ते 16/00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनोज चैतराम चिमनकर, वय 37 वर्ष, रा. संताजीनगर वार्ड क्र 7 कांद्री कन्हान यांनी त्यांची एमएच– 40/बीओ– 5166 क्रमांकाची पांढऱ्या रंगाची अॅक्टीव्हा मोपेड हॉटेल डी वाईन समोर उभी करून ठेवली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 30,000/–रु. ची अॅक्टीव्हा मोपेड चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार खुशाल रामटेके 9284262596 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर